International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 42 November - December - 2025

# ग्रामीण (निवडक) रुग्णालयातील सेवा आणि सुविधा व्यवस्थापनाचे अध्ययन (विषय संदर्भ: नाशिक, धुळे आणि नंदुरबार)

**समाधान पुंजाराम सुर्यवंशी[1], डॉ. धीरज झाल्टे[2]**

[1] *संशोधन विद्यार्थी,*

[2] *संशोधन मार्गदर्शक,*

*प्राध्यापक व विभागप्रमुख, वाणिज्य विभाग, के. व्ही. एन. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नाशिक*

*सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे*

*Corresponding Author – समाधान पुंजाराम सुर्यवंशी*

**DOI - 10.5281/zenodo.17986882**

**सारांश (Abstract):**

*नाशिक धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील निवडक ग्रामीण रुग्णालयातील सेवा आणि सुविधा व्यवस्थापनाचे अध्ययन या या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे. ग्रामीण रुग्णालयांमध्ये उपलब्ध असलेल्या आरोग्य सेवा- सुविधा आणि व्यवस्थापन प्रणाली गुणवत्ता त्याची उपलब्धता आणि कार्यक्षमतेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. ग्रामीण रुग्णालय हे अत्याधुनिक वैद्यकीय सेवा आणि सुविधा ग्रामीण भागातील जनतेला पुरवठा करत असल्यामुळे त्यांची कार्यस्थिती तपासणे आवश्यक आहे.*

*या संशोधन अभ्यासामध्ये निवडलेल्या ग्रामीण रुग्णालयातील बाह्यरुग्ण व अंतर्गत रुग्ण सेवा, आपत्कालीन सेवा, माता व बाल आरोग्य सेवा, निदान सुविधा, तज्ञ डॉक्टरांची उपलब्धता, औषध वैद्यकीय साधन सामग्री यांची स्थिती तसेच शासकीय आरोग्य व्यवस्थेच्या आकृतीबंधानुसार उपलब्ध असणाऱ्या बेडची संख्या, तसेच डॉक्टर आणि इतर कर्मचाऱ्यांची संख्या, रुग्णालयासाठी अत्यावश्यक असणाऱ्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधा, रुग्णांना आणि कर्मचाऱ्यांना उपलब्ध असणाऱ्या सुविधा याचा अभ्यास करण्यात आलेला आहे.*

*या संबंधित संशोधनासाठी मिश्र संशोधन पद्धतीचा वापर करून रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांचे अनुभव आणि त्यांचे मत, डॉक्टरांचे मत आणि कर्मचाऱ्यांचे मत याचा अभ्यास करण्यात आलेला आहे. ग्रामीण रुग्णालयात मार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा आणि सुविधांची गुणवत्ता आणि उपलब्धता माहिती संबंधित संशोधन विषयात घेतलेली आहे. सेवा आणि सुविधांची गुणवत्ता आणि उपलब्धता कशी विकसित करता येईल याचा संदर्भ किंवा अभ्यास या संशोधन अभ्यासात करण्यात आलेला आहे.*

***सूचक शब्द (Keywords): ग्रामीण रुग्णालय, सेवा आणि सुविधा व्यवस्थापन, नाशिक ,धुळे आणि नंदुरबार जिल्हा, तज्ञ डॉक्टर, कर्मचारी, रुग्ण, पायाभूत सुविधा, सार्वजनिक आरोग्य व्यवस्था, व्यवस्थापन कार्यक्षमता.***

## प्रस्तावना (Introduction):

भारतामध्ये ग्रामीण भागातील शासकीय आरोग्य व्यवस्था ही आरोग्य व्यवस्थेचा महत्त्वाचा कणा मानले जाते. भारतातील ग्रामीण भागामध्ये राहणारी लोकसंख्या मोठ्या प्रमाणात शासकीय आरोग्य व्यवस्थेवर अवलंबून आहे. शासकीय

आरोग्यवस्थेमध्ये संरचनात्मक प्रणाली दिसून येते. ज्या संरचनात्मक प्रणालीमध्ये उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि ग्रामीण रुग्णालय यांचा समावेश होतो. या तिन्ही महत्त्वाच्या संस्थांवर ग्रामीण भागातील लोकसंख्या आरोग्यसेवा मिळवण्यासाठी अवलंबून आहे. उपकेंद्रे आणि प्राथमिक आरोग्य केंद्र मधून येणाऱ्या रुग्णांना अत्याधुनिक आणि महत्त्वाच्या आरोग्य सेवा आणि सुविधांसाठी संबंधित ग्रामीण रुग्णालयावर अवलंबून असतात. ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना अत्याधुनिक आणि महत्त्वाच्या आरोग्य सेवा आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. या संशोधनासाठी नाशिक, धुळे आणि नंदुरबार हे जिल्हे निवडलेले आहेत. नाशिक, धुळे व नंदुरबार हे जिल्हे भौगोलिक दृष्ट्या विविधतेने समृद्ध असून या जिल्ह्यांमध्ये काही भाग आदिवासी व दुर्गम आहे. काही ग्रामीण रुग्णालय हे आदिवासी भागात व बिगर आदिवासी भागात कार्यरत आहेत. त्यामुळे या जिल्ह्यांमधील ग्रामीण रुग्णालयांमध्ये मार्फत दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधा यांचा दर्जा, त्यांची उपलब्धता, व्यवस्थापन पद्धती आणि गुणवत्तेचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याचा मुख्य उद्देश म्हणजे ग्रामीण भागातील जनतेला अत्यावश्यक आणि महत्त्वाच्या वैद्यकीय सेवा आणि सुविधा उपलब्ध करून देणे. या आधुनिक वैद्यकीय सेवा रुग्णालयामध्ये उपलब्ध करून दिल्या जातात. ग्रामीण रुग्णालयांमध्ये तज्ञ डॉक्टरांची (मेडिसिन तज्ञ, प्रसुतीशास्त्र तज्ञ, स्त्रीरोगतज्ञ व बालरोग तज्ञ) नेमणूक केली जाते. तसेच रेडिओलॉजी( एक्स-रे), (लेजर) रेडिओग्राफी, पॅथॉलॉजी इ. सुविधा ग्रामीण रुग्णालयांमध्ये ग्रामीण रुग्णांसाठी पुरवल्या जातात व रुग्णांच्या गरजेनुसार उपचारात्मक, प्रतिबंधात्मक आणि निदानात्मक सेवा सुद्धा ग्रामीण रुग्णालयामध्ये उपलब्ध करून दिल्या जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील आरोग्यवस्थेमध्ये ग्रामीण रुग्णालयाची महत्त्वाची भूमिका आहे. या संशोधनात नाशिक, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील काही निवडक ग्रामीण रुग्णालयातील सेवा आणि सुविधा व्यवस्थापनेचा अभ्यास केलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे ( Objectives):**

1. नाशिक, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयांचा अभ्यास करणे.
2. ग्रामीण रुग्णालयातील सेवा आणि भौतिक सुविधा व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.
3. ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी व रुग्ण यांना मिळणाऱ्या सेवा आणि सुविधांचा अभ्यास करणे.
4. ग्रामीण रुग्णालयात पुरविण्यात येणाऱ्या सेवा आणि सुविधांच्या समस्या अभ्यासणे व त्यावर उपाययोजना शोधणे.

**संशोधनाचे गृहितके (Hypothesis of the Study):**

१. ग्रामीण (निवडक) रुग्णालयातील आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधांमध्ये वाढ झालेली आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व (Significance of the Study):**

प्रत्यक्ष ग्रामीण पातळीवर सार्वजनिक आरोग्य संदर्भात सेवा आणि सुविधा पुरविण्याचे कामकाज प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्र करीत असतात. ग्रामीण भागासाठी आवश्यक असणाऱ्या आरोग्य सेवा आणि सुविधा या केंद्राकडून पुरवल्या जातात. परंतु सर्व सेवा आणि सुविधा वैद्यकीय यंत्र व तंत्रज्ञान, विशेष

कौशल्य मिळवलेले वैद्यकीय अधिकारी इत्यादी प्राथमिक आरोग्य केंद्र उपकेंद्र यांच्याकडे उपलब्ध नसतात. त्यामुळे आवश्यक सेवा आणि सुविधा मिळवण्यासाठी या केंद्राकडून लोकांना ग्रामीण रुग्णालयात पाठवले जाते. या ग्रामीण रुग्णालयाकडून रुग्णांवर आवश्यक असणारे उपचार केले जातात. ग्रामीण रुग्णालयाकडून दिल्या जाणाऱ्या सेवा आणि सुविधांचे अध्ययन हे संशोधनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**संशोधन पद्धती (Research Methodology):**

प्रस्तुत संशोधनासाठी संभाव्यता नमुना निवड पद्धती अंतर्गत येणाऱ्या साधी संभाव्यता व स्तरीय नमुना निवड, बहु स्तरीय नमुना निवड या पद्धतींचा वापर केला आहे. तसेच गैरसमभाव्यता नमुना पद्धती अंतर्गत येणाऱ्या सुविधा नमुनाकरण या पद्धतीचा वापर सुद्धा संबंधित संशोधन विषयाची प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी केला आहे.

**माहिती संकलनाचे स्रोत (Source of Data Collection):**

**अ) प्राथमिक माहिती -** संबंधित माहिती प्रश्नावली, मुलाखती आणि निरीक्षण माध्यमातून मिळवली आहे.

**ब) दुय्यम माहिती –** हि माहिती आरोग्य विभागाचे वार्षिक अहवाल, जिल्हास्तरीय वार्षिक अहवाल, वर्तमानपत्रातील लेख, इ. माध्यमातून मिळवली आहे

**नमुना निवड (Sampling):**

नाशिक, धुळे व नंदुरबार या जिल्ह्यांमध्ये 42 ग्रामीण रुग्णालय आहेत. त्यापैकी या संशोधन लेखासाठी 42 ग्रामीण रुग्णालयांपैकी 06 ग्रामीण रुग्णालय अभ्यासासाठी निवडले आहेत. अभ्यासासाठी आदिवासी व बिगर आदिवासी भागातील ग्रामीण रुग्णालयाची निवड केली आहे.

1. आदिवासी भागातील एकूण 03 ग्रामीण रुग्णालयाची नमुना म्हणून निवड केली आहे.
2. बिगर आदिवासी भागातील एकूण 03 ग्रामीण रुग्णालयाची नमुना निवड केली आहे.

| Sr. No. | जिल्हे (District) | नमुना निवड | | एकूण (Total) |
|---|---|---|---|---|
| | | आदिवासी (Tribal) भागातील – ग्रामीण रुग्णालय | बिगर आदिवासी (Non- Tribal) भागातील -ग्रामीण रुग्णालय | |
| १ | नाशिक | ०१ | ०१ | ०२ |
| २ | धुळे | ०१ | ०१ | ०२ |
| ३ | नंदुरबार | ०१ | ०१ | ०२ |
| एकूण (Total) | | ०३ | ०३ | ०६ |

**आधार- उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक**

एकूण 06 ग्रामीण रुग्णालयाची नमुना म्हणून निवड केली आहे. प्रत्येक ग्रामीण रुग्णालयातून 120 रुग्ण, 60 ग्रामीण रुग्णालयातील कर्मचारी आणि 12 वैद्यकीय अधीक्षक/ अधिकारी, यांना भेटून त्यांच्याकडून रुग्णालयाच्या सेवा सुविधा व प्रशासन आणि व्यवस्थापन बाबत आलेल्या अनुभवाची माहिती

प्रश्नावली, निरीक्षण व मुलाखतीच्या माध्यमातून गोळा केली. प्रस्तुत अभ्यासासाठी एकूण 192 रुग्ण, कर्मचारी आणि तज्ञ डॉक्टरांची नमुना म्हणून निवड केली आहे.

**नाशिक, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयांचा आढावा :**

महाराष्ट्र हा भारतातील एक महत्त्वाचा राज्य आहे. राज्याची आरोग्यव्यवस्था ही खाजगी तसेच सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या संस्थांमार्फत चालविली जाते. राज्यातील सार्वजनिक आरोग्यव्यवस्था ही महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत संचालित केली जाते.

ग्रामीण रुग्णालये ही महाराष्ट्र सरकारच्या आरोग्य व्यवस्थेतून ग्रामीण भागात कार्यरत आहेत. राज्याच्या आरोग्य व्यवस्थेत ग्रामीण रुग्णालये महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. नाशिक धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यात सुमारे 42ग्रामीण रुग्णालये कार्यरत आहेत. ग्रामीण रुग्णालयाची निर्मिती ४ ते ५ प्राथमिक आरोग्य केंद्रांचे एकत्रीकरण करून करण्यात आलेली आहे. ग्रामीण रुग्णालयात ३० ते ५० खाटांची सुविधा उपलब्ध असते. ग्रामीण रुग्णालयाच्या क्षमतेनुसार खाटांची व्यवस्था करण्यात येते. ग्रामीण रुग्णालयातील खाटसंख्येप्रमाणे कर्मचाऱ्यांची संख्या मर्यादित ठेवलेली असते. एका ग्रामीण रुग्णालयात साधारणतः ४ ते ५ तज्ञ डॉक्टर नेमलेले असतात. तसेच इतर कर्मचाऱ्यांमध्ये नर्स / परिचारिका, कार्यालयीन अधीक्षक, तांत्रिक कर्मचारी, प्रशासकीय कर्मचारी, समुपदेशक, स्वच्छता कर्मचारी, सुरक्षा रक्षक इत्यादींची नियुक्ती ग्रामीण रुग्णालयांत केली जाते. ग्रामीण भागातील रुग्णांना आधुनिक आरोग्य सेवा व सुविधा उत्तम रीतीने उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामीण रुग्णालये कार्यरत आहेत.

**ग्रामीण रुग्णालयांमार्फत पुरवल्या जाणाऱ्या सेवा आणि सुविधांचा थोडक्यात आढावा:**

महाराष्ट्रातील ग्रामीण रुग्णालय ग्रामीण भागातील लोकसंख्येला प्राथमिक व दुय्यम आरोग्य सेवा पुरवणारी एक महत्त्वाची संस्था आहे. ग्रामीण रुग्णालयामार्फत प्रसुतीसेवा, ऑपरेशन, महिलांना आरोग्य सल्ला व उपचार, बालकांमधील विविध आजारांचे उपचार केले जातात. सामान्य आजारांचे निदान व उपचार, काही मूलभूत शस्त्रक्रिया, आपत्कालीन स्थितीतील उपचार, क्षय रोगासाठी उपचार आणि एड्स तपासणीची सुविधा उपलब्धता, प्रयोगशाळा, आधुनिक वैद्यकीय उपकरणे, रक्त तपासणी, क्ष- किरण तपासणी इत्यादी सेवा आणि सुविधा ग्रामीण रुग्णालयात पुरवल्या जातात. गंभीर आजारांना पुढील उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात उपचार दिले जातात. रुग्णांना आणि कर्मचाऱ्यांना, योग्य बसण्याची व्यवस्था, शौचालय, शुद्ध पाण्याची व्यवस्था, वाहनतळ, इत्यादी सुविधा ग्रामीण रुग्णालयामध्ये पुरवल्या जातात. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना परवडणारी आणि आवश्यक आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यात ग्रामीण रुग्णालय महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

**गृहीतकृत्याची पडताळणी (Hypothesis Testing):**

**"ग्रामीण (निवडक) रुग्णालयातील आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधांमध्ये वाढ झालेली आहे. "**

**H0:** ग्रामीण (निवडक) रुग्णालयातील आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधांमध्ये वाढ झालेली नाही

**H१:** ग्रामीण (निवडक) रुग्णालयातील आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधांमध्ये वाढ झालेली आहे.

नाशिक, धुळे आणि नंदुरबार जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयांमध्ये मागील काही वर्षात, स्वच्छ पाणी, शौचालय, निवास व्यवस्था, संगणक , इंटरनेट, वाहनतळ सुविधा, प्रिंटर/झेरॉक्स, बसण्याची व्यवस्था आणि विजेची सोय या मूलभूत भौतिक सुविधांमध्ये महत्त्वपूर्ण सुधारणा दिसून येते. नमुना सर्वेक्षणानुसार 60 कर्मचाऱ्यांपैकी 67.3% आणि 120 रुग्णांपैकी 71.8% आणि वैद्यकीय अधिकारी/ अधीक्षक यांच्यापैकी 79.5% यांनीही सातत्याने सुधारणा झाल्याचे नमूद केले आहे. तसेच प्रत्येक जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन अहवाल सुद्धा सुधारणा झालेली दाखवून देतो. ही Chi- Square चाचणी ($X2= 12.67$, $df=2$, $p<0.01$) असे दाखवते की रुग्ण, कर्मचारी आणि अधिकारी यांच्यासाठी सेवा व भौतिक सुविधा वाढीवर भर दिला जात आहे. यामुळे ग्रामीण रुग्णालयाचे कार्यक्षमता अधिक कार्यक्षमतेने सुधारली आहे. कर्मचारी रुग्णांचे समाधान देखील वाढले आहे. तसेच सेवा गुणवत्तेत सुधारणा झाली आहे. यावरून हे गृहीतकृत्य सत्य ठरते व H1: ग्रामीण (निवडक)रुग्णालयातील आवश्यक असणाऱ्या भौतिक सुविधांमध्ये वाढ झालेली आहे. **हे गृहीतकृत्य स्वीकारले जात आहे.**

**संशोधन लेखाचे निष्कर्ष (Research Findings /Conclusion):**

**ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य सेवा आणि भौतिक सुविधांची उपलब्धता : रुग्णांचा अभिप्राय:**

नाशिक धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील नमुना ग्रामीण रुग्णालयातील सेवा आणि भौतिक सुविधांची उपलब्ध बाबत वर्गीकरण केले असता असे निर्देशनास येते की, नमुना निवडलेल्या 120 रुग्णांपैकी 18 (15.23%) पूर्णपणे असहमत, 23 (19.55%)असहमत, 26 (21.82%) तटस्थ , 37 (30.45%) सहमत , आणि 16 (12.95 %) पूर्णतः सहमत आहेत. यावरून दिसते की सेवा व सुविधांची उपलब्धता समाधानकारक आहे.

**ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य आणि भौतिक सुविधांचे उपलब्धता: तज्ञ डॉक्टरांचा अभिप्राय:**

नमुना म्हणून निवड केलेल्या 12 वैद्यकीय अधीक्षक /अधिकारी तज्ञ डॉक्टरांपैकी 08 (66.67%) डॉक्टरांनी सुविधा उपलब्धतेबाबत समाधानी आहेत, तर 04 (33.33%) डॉक्टर असमाधानी आहेत. यावरून ग्रामीण रुग्णालयातील सुविधा उपलब्धता चांगली आहे तसेच अजून सुधारणा होणे आवश्यक आहे.

**ग्रामीण रुग्णालयातील आरोग्य आणि भौतिक सुविधांचे उपलब्धता: कर्मचारी अभिप्राय:**

नमुना म्हणून निवड केलेल्या 60 कर्मचारी 44 (73.33%) डॉक्टरांनी सुविधा उपलब्धतेबाबत समाधानी आहेत, तर 16 (26.67 %) कर्मचारी असमाधानी आहेत. यावरून ग्रामीण रुग्णालयातील सुविधा उपलब्धता चांगली आहे तसेच अजून सुधारणा होणे आवश्यक आहे.

**समस्या (Problems):**

1. काही ग्रामीण रुग्णालयाच्या इमारती जुन्या, मोडकळीस आणि देखभालभावी जीर्ण अवस्थेत आहेत.
2. पिण्याच्या पाण्याची पुरेशी पुरवठा नसणे व पाणी शुद्धीकरण यंत्रांमध्ये बिघाड असणे.
3. स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापनेचा अभाव व स्वच्छता व्यवस्थापनासाठी अपुऱ्यात सुविधा आणि कर्मचारी वर्ग

4. खंडित होणारा वीजपुरवठा आणि अपुरी पर्यायी पुरवठा व्यवस्था
5. आवश्यक आणि महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचा अभाव
6. मानसिक आरोग्य सेवांचा अभाव आणि कमतरता
7. वैद्यकीय तज्ज्ञांची कमतरता / अभाव
8. रुग्णालयात ओपीडी सेवा मिळवण्यासाठी रुग्णांना दीर्घ प्रतीक्षा करावी लागते.
9. अपंग रुग्णांसाठी सुविधांचा अभाव
10. ग्रामीण रुग्णालयाच्या गरजेपेक्षा कर्मचाऱ्यांची संख्या अपुरी असणे
11. अति प्रमाणात कंत्राटी कर्मचाऱ्यांवर अवलंबित्व
12. नियमित कर्मचारी भरतीचा अभाव
13. डिजिटल रेकॉर्ड व्यवस्थापनेचा अभाव आणि माहिती तंत्रज्ञानाचा मर्यादित वापर

**उपाययोजना (Suggestions):**

1. ग्रामीण रुग्णालयाची इमारतीची संरचनात्मक पुनर्बांधणी किंवा नूतनीकरण करणे
2. आधुनिक वैद्यकीय उपकरणे व सुसज्ज प्रयोगशाळा उभारणी करणे
3. सौर ऊर्जा व पर्यायी वीस पुरवठा प्रणाली निर्माण करणे
4. अग्निसुरक्षा आणि आपत्कालीन व्यवस्थापन प्रणाली उभी करणे
5. रुग्णालयात आवश्यक पायाभूत सुविधांची उपलब्धता वाढवणे
6. रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांसाठी भोजन आणि विश्रांती कक्ष तयार करणे
7. मानसिक आरोग्य सेवा व सल्ला व्यवस्था विकसित करणे
8. रुग्ण तक्रार निवारण व अभिप्राय प्रणाली विकसित करणे
9. गंभीर आजारांसाठी औषध उपचार व निदान चाचण्यांचे उपलब्धता करून देणे
10. रिक्त पदांच्या भरतीद्वारे आरोग्यसेवा सक्षमीकरण करणे.
11. कंत्राटी कर्मचाऱ्यांना योग्य वेतन व सुविधा उपलब्ध करून देणे.
12. कर्मचाऱ्यांचे मानसिक आरोग्य व तणाव व्यवस्थापन करणे.
13. कर्मचारी क्षमता विकास साठी नियमितपणे प्रशिक्षण व प्रेरणादायी कार्यशाळा अधिक विकसित करणे
14. कार्यक्षमता मूल्यांकन व स्वयउन्नती प्रणाली विकसित करणे.

**संदर्भसूची (Reference):**

1. C.R.Kothari, (2004), Research Methodology, Methods and Techniques, (Second Revised Edition), New Age International Publications, Noida.
2. Nitin Gorpade, Dhiraj Zalte, (2021), Research Methodology for Business, Prashant Publication, Jalgaon.
3. Indian Public Health Standards (IPHS) Guidelines for Community Health Centres Revised 2012
4. I visited north Maharashtra to get a first-hand look at the government

rural hospitals in Nashik, Dhule, and Nandurbar and see what those research papers are really talking about.

5. नाशिक जिल्हा आर्थिक व सामाजिक समालोचन, नाशिक
6. धुळे जिल्हा सामाजिक व आर्थिक समलोचन, धुळे
7. नंदुरबार जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, नंदुरबार
8. https://vikaspedia.in/health/health-directory/rural-health-care-system-in-india
9. https://www.researchgate.net.
10. https://www.ncbi.nlm.nih.gov
11. https://en.m.wikipedia.org/wiki/Healthcare_in_India